एसआयआरडी-११/२०१०-११/आरडीडी/०३
दि. २४/०२/२०११

प्रति,

**मा. प्राचार्य,**

ग्रामसेवक / पंचायत राज / संयुक्त प्रशिक्षण केंद्र

----------------------------

**विषय : राष्ट्रीय ग्राम स्वराज योजनेअंतर्गत नवीन निवडून आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम-उपस्थित सदस्यांना प्रवास खर्च देण्याबाबत...**

संदर्भ : एसआयआरडी-११/२०११-११/आरडीडी /०३, दि. ३ डिसेंबर २०१०

राष्ट्रीय ग्राम स्वराज योजने अंतर्गत राज्यातील ( **दि. १/१/२०१० नंतर निवडून आलेले** ) नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्याच्या क्षमतावृध्दीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम ग्राम विकास विभाग व यशदामार्फत सुरु करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम **मोहीम स्वरूपात** राज्यातील २१ जिल्हयांमध्ये आपल्या ग्रामसेवक / पंचायत राज व संयुक्त प्रशिक्षण केंद्रांमार्फत दि. ६ डिसेंबर २०१० पासून राबविण्यात येत आहे

आपल्या प्रशिक्षण केंद्रांचे उद्यिष्ट व उपलब्ध निधी विचारात घेवून यशदामार्फत आपणास निधी वेळोवेळी पाठविण्यात आला व येत आहे. यापुर्वी संदर्भिय पत्रान्वये सदर निधीतून प्रशिक्षणार्थींसाठी निवास, भोजन, प्रशिक्षण साहित्य त्याचप्रमाणे प्रशिक्षक मानधन, क्षेत्र भेटीवरील खर्च व प्रशिक्षण अनुषंगिक खर्च करण्याबाबत कळविले होते. **आता सदर निधीतून प्रशिक्षणार्थींचे एकवेळचे जाणे-येणेच्या प्रवास भाडयाची रक्कम देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तरी आता सदर निर्णयानुसार अगदी विनाविलंब दि. २४/०२/२०११ पासून सुरु झालेल्या / होणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांमधील प्रशिक्षणार्थींना प्रवास भाडयाच्या रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यात यावी.** प्रशिक्षणार्थींना दयावयाच्या कार्यमुक्त अहवालात तसा उल्लेख करावा अगर स्वतंत्र पत्राव्दारे तसे संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक / सरंपच यांना व गट विकास अधिकारी यांना कळवावे. तसेच प्रशिक्षण कार्यक्रम निवासी व गुणवत्तापूर्वकच होतील याची विशेषत्वाने दक्षता घ्यावी.

**उपमहासंचालक तथा संचालक,**
राज्य ग्रामीण विकास संस्था

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :**

१. **उपायुक्त** ( आस्थापना ), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

२. **उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( ग्रां.पं.)**, जिल्हा परिषद ----------------

**प्रत माहितीसाठी सस्नेह :**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( **आरजीएसवाय जिल्हे** )

**प्रत माहितीसाठी सादर;**

**डॉ. मल्लिनाथ कलशेटटी**, उपसचिव, ग्राम विकास विभाग,महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

एसआयआरडी-११/२०१०-११/आरडीडी/०३
दि. २४/०२/२०११

**मा. सादर**

**विषय : राष्ट्रीय ग्राम स्वराज योजनेअंतर्गत नवीन निवडून आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम-उपस्थित सदस्यांना प्रवास खर्च देण्याबाबत...**

संदर्भ : एसआयआरडी-११/२०११-११/आरडीडी /०३, दि. ३ डिसेंबर २०१०

.उपरोक्त विषयानुसार राष्ट्रीय ग्राम स्वराज योजनेअंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्यांना एकवेळचा प्रवासखर्च देण्याबाबत दिनांक ११/०२/२०११ टिप्पणीमध्ये पृष्ठ क्र. २ वरील मुद्या क्र. ३ अन्वये निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाबाबत स्वयंसेवी संस्थांना कळविण्यात आलेले आहे.

०२ यापुर्वी संदर्भिय पत्रान्वये सदर निधीतून प्रशिक्षणार्थीसाठी निवास, भोजन, प्रशिक्षण साहित्य त्याचप्रमाणे प्रशिक्षक मानधन, क्षेत्र भेटीवरील खर्च व प्रशिक्षण अनुषंगिक खर्च करण्याबाबत कळविले होते. **आता सदर निधीतून प्रशिक्षणार्थीचे एकवेळचे जाणे-येणेच्या प्रवास भाडयाची रक्कम देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तरी आता सदर निर्णयानुसार अगदी विनाविलंब दि. २४/०२/२०११ पासून सुरु झालेल्या / होणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांमधील प्रशिक्षणार्थींना प्रवास भाडयाच्या रक्कमेची प्रतिपूर्ती करण्याबाबत** ग्रामसेवक/पंचायत राज / संयुक्त प्रशिक्षण केंद्राना कळविण्याबाबत पत्राचे प्रारुप मान्यतेस्तव सविनय सादर. कृपया पताका अ व पृष्ठ क्र चे अवलोकन व्हावे.

( संशोधन सहाय्यक )

- अतिरिक्त संचालक तथा सहयोगी प्राध्यापक, रा ग्रा वि संस्था

- मा. उपमहासंचालक तथा संचालक, रा ग्रा वि संस्था